# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परीपत्रक - १९९

जा.क्र. झोपुप्रा/नर/ आरक्षण पुन:रचना/ 302
दि. 13 /१०/२०२१

विषय :- मंजूर सुधारीत विकास योजना २०३४ नकाशामध्ये सुधारणा करणेबाबत.

संदर्भ :- १) मा. आयुक्त, बृनमुंबई महानगर पालिका यांचे पत्र क्र. MPC/११५३ दि. ०९/०९/२०२१ (सोबत प्रत जोडली आहे.)
२) मा. आयुक्त, बृनमुंबई महानगर पालिका यांचे निर्देश क्र. CHE/DP/ 32899 दि. २६/०४/२०१९ (सोबत प्रत जोडली आहे.)

शासनाच्या दि.०८/०५/२०१८ रोजीच्या अधिसूचनेमधील मंजूर सुधारीत विकास योजना-२०३४ नकाशामध्ये सुधारणा करण्याची कार्यपध्दती बृहन्मुंबई महानगर पालिकेने निश्चित केली असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून विकसन प्रस्ताव मंजूर करताना जागेवरील आरक्षणांची पुन:रचना मंजूर केली असल्यास सदर आरक्षणांची सुधारीत रचना मंजूर सुधारीत विकास योजना-२०३४ नकाशामध्ये दर्शविणे आवश्यक केले आहे. त्याबाबतचे धोरण बृहन्मुंबई महानगर पालिकेने संदर्भ क्र. २ अनुसार निर्गमित/प्रसिध्द केले आहे. सोबत प्रत जोडली आहे. त्याचे अवलोकन करावे.

संदर्भित पत्रामध्ये नमूद बाबी विचारात्त घेता झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाकडून विकसन प्रस्ताव मंजूर करताना मंजूर सुधारीत विकास योजना-२०३४ मधील आरक्षणांच्या रचनेमध्ये सुधारणा प्रस्तावित असल्यास त्यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेने निर्गमित/प्रसिध्द केलेल्या संदर्भ क्र. २ धोरणामधील "अे" नुसार कार्यवाही करावी असे सुचित करण्यात येत आहे. संदर्भ क्र. २ नुसार बृहन्मुंबई महानगर पालिकेने निर्गमित/प्रसिध्द केलेल्या धोरणामधील "अे" नुसार कार्यवाही करून प्रत्येक आरक्षणाच्या फेररचनेबाबत आवश्यक ते लेखी कारण नमूद करून सदर आरक्षणांची फेररचना अधिकृत भागनकाशासह मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सही शिक्क्याने आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. तसेच सदर आदेशाची प्रत भाग नकाशासह शासन नगर विकास विभाग, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य व उपसंचालक नगर रचना, बृहन्मुंबई यांना माहितीसाठी व अभिलेखासाठी पाठविण्यात याव्यात व सदर आरक्षणांचे फेररचना आदेश अधिकृत भाग नकाशासह बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या उप मुख्य नियोजक (वि.यो.) यांना GIS मधील सुधारणेकरीता पाठविण्यात यावेत.

उक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता सर्व संबधितांनी घ्यावी.

(सतिश लोखंडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण

प्रत :- १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण यांचे स्विय सहाय्यक

३. उप मुख्य अभियंता/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण
४. कार्यकारी अभियंता (मुंबई शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे)/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
५. उप जिल्हाधिकारी (मुंबई शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे)/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
६. सहाय्यक निबंधक (मुंबई शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे)/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
७. प्रशासकीय अधिकारी / झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
८. मिळकत व्यवस्थापक/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
९. मुख्य विधी सल्लागार/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
१०. नगर रचना विभाग/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
११. जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
१२. माहिती व तंत्रज्ञान / झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.
१३. जनसंपर्क अधिकारी/ झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण.